॥ सृष्टीचे चमत्कार ॥

श्लोक उपजाति

वैशाखमासीं प्रतिवर्षि येती
आकाशमार्गीं नव मेघपंक्ती
नेमेंचि येतो मग पावसाळा
हें सृष्टिचें कौतुक जाण बाळा. ॥ १ ॥
पेरूनियां तें मण धान्य एक
खंडींस घे शेतकरी अनेक
पुष्पें फळें देति तरू कसे रे ?
हें सृष्टिचें कौतुक होय सारें ॥ २ ॥
ऋतू वसंतादिक येति जाती
तैसेचि तेही दिन आणि राती
अचूक चाले क्रम जो असा रे
हें सृष्टिचें कौतुक जाण सारें. ॥ ३ ॥
पाणी पहा मेघ पितात खारें
देती परी गोड फिरूनि सारें
तेणेंचि हा होय सुकाळ लोकीं
हें सृष्टिचें कौतुक बा विलोकीं. ॥ ४ ॥
ते तापले डोंगर उष्णकाळीं
पानें तृणें वाळुनि शुष्क झालीं
तथापि तेथें जळ गार वाहे
झऱ्यांतुनी कौतुक थोर बा हें ॥ ५ ॥
वठोनि गेल्या तरुलागिं पाणी
घालावया जात न कोणि रानीं;
वसंतिं ते पालवतात सारे
हें सृष्टिचें कौतुक होय बा रे! ॥ ६ ॥
ऐसे चमत्कार निजप्रभावें
दावी प्रभू त्यास अनन्यभावें
प्रार्थीत जा सांजसकाळ नित्य
जोडी सुखाची मिळवाल सत्य. ॥ ७ ॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999